महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/मा.सं.व्य.प्र./ना.क्र./
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला,प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा
मुंबई ४००-०१९
Email : cgmp@mahadiscom.in
Website: www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र.५२३ दिनांक :-१९.११.२०१५

**विषय :- सेवानिवृत्तीच्या दिनांकास कर्मचाऱ्यांना अदा करण्यात येणाऱ्या अंतिम देयकां बाबत कालावधीची मर्यादा पाळण्याबाबत.**

महावितरण कंपनी मधून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची अंतिम देयके सेवा निवृत्ती नंतर कर्मचाऱ्यांना वेळेवर मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी कर्मचारी व कामगार संघटनांकडून वारंवार होत आहेत.

सदर तक्रारींची दखल घेवून मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प), संचालक (वित्त) यांचे सोबत विचार विनिमय करुन निवृत्त होणा-यांना कर्मचाऱ्यांना त्यांचे निवृत्ती देयके विना विलंब देण्या करीता प्रचलित कार्यप्रणालीमध्ये खालील प्रमाणे बदल त्वरीत कार्यान्वित करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

अ) जे कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहेत अशा कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीपूर्वी एक महिना अगोदर त्यांच्या खाती शिल्लक असलेल्या रजेची माहीती देऊन त्यांचे कडून सेवानिवृत्ती पर्यंतच्या उर्वरीत कालावधीत रजा उपभोगणार नसल्याचे संमतीपत्र घेण्यात यावे. कर्मचाऱ्याने अशी संमती दिल्यास त्यांच्या खाती शिल्लक रजेच्या रोखीकरणाची रक्कम परिगणना व अंकेक्षण करुन सेवा निवृत्तीच्या दिवशी, "कर्मचाऱ्यांने सदर रजा एक महिन्याच्या कालावधीत उपभोगली नाही" याची खातर जमा करुन कर्मचाऱ्यांच्या बँक खाती (कंपनीच्या येणे रकमा इ. वजा करुन) ECS द्वारें जमा करण्यात यावी.

ब) कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीच्या दिवशी सेवा उपदानाचा धनादेश प्रदान करण्यात येतो. त्याऐवजी सेवा उपदानाची रक्कम सेवा निवृत्तीच्या दिवशीच ECS द्वारे बँक खात्यात जमा करण्यात यावी.

क) कर्मचारी कुटुंब निवृत्ती वेतनाचा अर्ज तसेच त्या सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची सूचि (Check list) कर्मचाऱ्यास सेवानिवृत्ती पूर्वी हस्तांतरीत करुन त्यांच्या कडून कर्मचारी निवृत्ती वेतनाचा अर्ज भरुन घ्यावा. तसेच सेवानिवृत्ती नंतर ३० दिवसात सदर अर्ज प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्तांकडे पाठविणे बंधनकारक राहील.

कर्मचारी निवृत्ती वेतन, रजा रोखीकरण आणि सेवा उपदानाच्या पूर्ततेबाबतीत व त्यासाठीच्या नमूद कालावधीबाबत कोणत्याही प्रकारे दिरंगाई होणार नाही याची खबरदारी संबधीत मानव संसाधन विभागाने घ्यावयाची आहे.

सदरचे प्रशासकीय परिपत्रक हे कंपनीच्या RAPDRP वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(नीलेश गटणे)
कार्यकारी संचालक (मासं)